**Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar**

**Date - 15 November 2024**

**Time 7.10 AM to 7.20 AM**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

प्रादेशिक बातम्या

- आदिवासी गौरव दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन
- राज्याच्या विकासासाठी महायुतीचं सरकार निवडून देण्याचं भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन
- महाविकास आघाडी सत्तेत आल्यास सोयाबीन खरेदी सात हजार रुपये प्रति क्विंटल दराने करणार असल्याचं काँग्रेसचं आश्वासन
- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार इतिहास संशोधक डॉ. जयसिंग पवार यांना जाहीर
- मतदान जनजागृतीसाठी प्रशासनाकडून विविध उपक्रम, बहुतांश ठिकाणी गृहमतदान सुरु
- महिला आशिया हॉकी स्पर्धेत भारताचा सलग तिसरा विजय

****

देशाच्या परंपरेत आदिवासी समुहाचं योगदान महत्वाचं असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. आदिवासी समाजाचं नेतृत्व केलेल्या भगवान बिरसा मुंडा यांची जयंती, आज आदिवासी गौरव दिवस म्हणून साजरा होत असून, या दिनाच्या पूर्वसंध्येला काल राष्ट्रपतींनी देशाला संबोधित केलं. आदिवासी समाज विकसित झाल्यास देशाचा विकास होईल, असं सांगून त्यांनी, आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबवल्या जात असल्याचं नमूद केलं. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आदिवासी समाजाचं योगदान महत्त्वाचं असून, भगवान बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली लढला गेलेला संघर्ष येणाऱ्या काळात प्रेरणादायी असेल, असं राष्ट्रपती

म्हणाल्या. आदिवासी गौरव दिनानिमित्त आज बिहारमध्ये होणाऱ्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत.

****

शिख धर्माचे संस्थापक, पहिले गुरु गुरु नानक यांची ५५५ वी जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त नांदेडच्या श्री सचखंड गुरुद्वारासह विविध गुरुद्वार्यांमध्ये भाजन, किर्तनासह धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

जलयुक्त शिवार योजनेमुळे मराठवाड्यातलं जलसंकट दूर झाल्याचं भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातल्या महायुतीच्या उमेदवारांसाठी चिकलठाणा इथं झालेल्या जाहीर सभेत ते काल बोलत होते. अनेक वर्षांपासून या भागात असलेला दुष्काळ दूर करण्यासाठी महायुती सरकारने ठोस उपाययोजना करण्यास सुरुवात केल्याचं मोदी यांनी सांगितलं. महायुतीचं सरकार पुन्हा आल्यास पुढील पाच वर्षात महाराष्ट्र विकासाची नवी क्षितीजं पादाक्रांत करेल, असं सांगून मोदी यांनी महायुती सरकार राबवत असलेल्या विविध योजनांचा यावेळी उल्लेख केला. शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले, यांच्यासह महायुतीचे इतर नेते आणि उमेदवार यावेळी उपस्थित होते.

यानंतर नवी मुंबईत खारघर इथं झालेल्या सभेत मोदी यांनी, महाराष्ट्राचा विकास हीच महायुतीची प्राथमिकता असून, विकसित महाराष्ट्र भारताचं ग्रोथ इंजिन होईल, असा विश्वास व्यक्त केला.

मुंबईत शिवाजी पार्क इथं या विधानसभा निवडणुकीतली पंतप्रधान मोदी यांची राज्यातली शेवटची प्रचारसभा काल पार पडली. सर्व राजकीय पक्षांनी विचारसरणी पेक्षा देशाला अधिक प्राधान्य द्यावं असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

महाविकास आघाडी सत्तेत आल्यास सोयाबीन खरेदी सात हजार रुपये प्रति क्विंटल दराने करण्यात येईल, अशी घोषणा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली.ते काल पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. कांद्याच्या दरासंदर्भात एक समिती स्थापन करणार असल्याचंही त्यांनी जाहीर केलं.

****

काँग्रेस नेते, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काल नांदेड आणि नंदुरबार इथं प्रचारसभेला संबोधित केलं. महाविकास आघाडीचं सरकार आल्यास महिला आणि शेतकरी हिताला प्राधान्य दिलं जाईल, शेतकऱ्यांचं तीन लाखापर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल, यासह विविध घोषणा गांधी यांनी यावेळी केल्या.

दरम्यान, सामान्य नागरिकांना भेटण्यासाठी राहुल गांधी यांनी अचानक नांदेड इथल्या मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली. अचानक निघालेल्या या ताफ्याने शहरवासीय तसंच सुरक्षा यंत्रणांचीही तारांबळ उडाली.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं जाहीर सभेला संबोधित केलं. महाराष्ट्रावर प्रेम करणारे आणि महाराष्ट्राची लूट करणारे या मधली ही लढाई असल्याचं, ते यावेळी म्हणाले. तत्पूर्वी ठाकरे यांनी काल अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीगोंदा आणि नेवासे इथं जाहीर सभा घेतल्या.

****

भाजप नेते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग इथं तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. ही विधानसभा निवडणूक जनतेच्या भवितव्याचा निर्णय करणारी निवडणूक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

छत्रपती संभाजीनगरमधल्या औरंगाबाद मध्य मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार जावेद कुरेशी यांच्या प्रचारार्थ पक्षाच्या नेत्या अंजली आंबेडकर यांची काल भीमनगर परिसरात सभा झाली.

****

येत्या २० तारखेला होणार्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन छत्रपती संभाजीनगर इथं एम ए प्रथम वर्षात शिकणारा दिव्यांग विद्यार्थी शैलेश देशमुख याने केलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज सातारा जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंग पवार यांना जाहीर झाला आहे. येत्या २५ नोव्हेंबरला मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर इथं ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जाणार आहे. दोन लाख रुपये आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

****

या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत

****

मराठवाड्यात काल अनेक ठिकाणी मतदार जनजागृतीसाठी रॅलीसह विविध उपक्रम राबवण्यात आले.

छत्रपती संभाजीनगरच्या औरंगाबाद पश्चिम मतदारसंघात आयोजित मॅरेथॉन रॅलीमध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी सहभागी झाले होते. यावेळी 'मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो', 'माझे मत माझा

अभिमान', 'आपले अमूल्य मत-करेल लोकशाही मजबूत' अशा घोषणा देण्यात आल्या.

****

धाराशिव जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रशासनाच्या वतीनं काल घेण्यात आलेल्या रन फॉर वोट मध्ये धाराशिव शहरातल्या सर्व शाळांमधल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला होता.

दरम्यान, तुळजापूर इथं काल स्वीप अंतर्गत श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय, कुलस्वामिनी माध्यमिक विद्यालय आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून मतदान जनजागृती केली. यावेळी मनोरंजनातून प्रबोधन करत प्रत्येक मतदारानं आपला हक्क बजावावा, असं आवाहन करत, उदयसिंह पाटील यांचा बोलक्या बाहुल्याचा कार्यक्रम झाला.

****

हिंगोली जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी काल दुचाकी रॅली काढण्यात आली. जिल्ह्यातलं मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा पुढं नेण्याचं आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी यावेळी केलं.

****

परभणी शहरातही काल शनिवार बाजार ते राजगोपालाचारी उद्यान रन फॉर वोट ही दौड काढण्यात आली. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्यासह पोलीस तसंच निवडणूक अधिकाऱ्यांनी या दौडला हिरवा झेंडा दाखवला. तत्पूर्वी जिल्हाधिकार्यांनी सर्वांना मतदानाची शपथ दिली.

****

नांदेड नजिक विष्णूपुरी इथल्या श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी आणि तंत्रशास्त्र संस्थेमध्ये स्वीप पथक आणि संस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजना यांच्यावतीने मतदान जनजागृती कार्यक्रम काल घेण्यात आला. यावेळी नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन करण्यात आलं.

****

जलान्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी काल भोकरदन विधानसभा मतदारसंघात मतमोजणी केंद्र आणि मतदान केंद्राना भेट देवून पाहणी केली. यावेळी पांचाळ यांनी भोकरदन नगर परिषदेच्या मंगल कार्यालयातल्या मतमोजणी केंद्राना प्रत्यक्ष भेट देवून मतदान यंत्रं सज्ज करण्याच्या प्रक्रियेदरम्यान उमेदवारांच्या नावांची तपासणी करुन एका मशीनवर 'मॉकपोल' करून व्हीव्हीपॅटद्वारे दिसणाऱ्या चिठ्ठीचीही खात्री करुन घेतली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड विधानसभा मतदारसंघात गृहमतदान सुरु असून, काल कन्नड शहरातल्या शांतीनगर इथल्या रहिवासी शकुंतला अनवडे या ८६ वर्षीय आजींनी मतदानाचा हक्क बजावला. त्यांचं मतदान नोंदवण्यासाठी स्वतः जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी त्यांच्या घरी हजर होते. परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे हे देखील काल गृह मतदानात प्रत्यक्ष सहभागी झाले होते. लातूर जिल्ह्यातल्या निलंगा विधानसभा मतदारसंघात कालपासून गृह मतदान सुरु झालं.

****

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी काल हिंगोली इथं विधानसभा निवडणूक तयारीचा आढावा घेतला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक अधिकारी, कर्मचार्यांनी काळजीपूर्वक काम करावं, जिल्ह्यात येत्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी निवडणूक यंत्रणेने विशेष प्रयत्न करावेत आदी सूचना त्यांनी दिल्या.

****

बिहारमधे सुरु असलेल्या, महिलांच्या आशियाई हॉकी करंडक स्पर्धेत काल भारताने थायलंडवर १३ - शून्य असा विजय मिळवला. भारतातर्फे दिपीकानं चमकदार कामगिरी करत पाच गोल नोंदवले. प्रिती दुबे, लालरेम सियामी आणि मनिषा चौहान या तिघींनी प्रत्येकी दोन गोल केले. या स्पर्धेतला भारताचा हा सलग तिसरा विजय आहे.

****

पठणच्या जायकवाडी धरणातून गेल्या २४ सप्टेंबर पासून सुरू असलेला पाण्याचा विसर्ग आज पूर्णपणे थांबवण्यात आला. यंदाच्या पावसाळ्यात धरणात सुमारे तीन हजार १४५ दशलक्ष घनमीटर पाण्याची आवक झाली, तर धरणातून प्रथम ९ ते १३ सप्टेंबर आणि त्यानंतर २४ सप्टेंबर ते १४ नोव्हेंबर या काळात सुमारे ८६३ दशलक्ष घनमीटर पाण्याचा विसर्ग करण्यात आलं.